06-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/5/2025 9:40 PM Page 1



## निवडक

### दीर्घकालीन महसूल प्रकरणांवर दर सोमवारी सुनावणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ५ :** दक्षिण गोवा जिल्ह्यात दीर्घकाळ प्रलंबित महसूल प्रकरणांचा निकाल लवकर लागावा यासाठी जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी सर्व उपजिल्हाधिकारी आणि महसूल अधिकाऱ्यांना दर सोमवारी सकाळी विशेष सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. ही सुनावणी पाच वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर केंद्रित असेल.

जिल्हा प्रशासनाने अलीकडेच केलेल्या आढाव्यात विविध महसूल न्यायालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रलंबित प्रकरणे असल्याचे समोर आले. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. कायदेशीर प्रक्रियेचा सन्मान राखून या प्रकरणांचे तातडीने निराकरण करण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले असून, पुढील तीन महिन्यांत ही प्रकरणे निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत प्रत्येक महसूल कार्यालयाने पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांची साप्ताहिक यादी तयार करणे बंधनकारक असेल. सोमवारी आयोजित होणाऱ्या विशेष सत्रांमध्ये या प्रकरणांना प्राधान्याने सुनावणीसाठी घेतले जाणार आहे. प्रलंबित प्रकरणे निकाली काढल्यानंतर नियमित प्रकरणांचाही विचार केला जाईल.

सुनावणीला अनुपस्थित राहणाऱ्या पक्षकारांसाठी (वकील किंवा अधिकृत प्रतिनिधींसह) आवश्यक असल्यास पर्यायी तारीख देण्याची मुभा आदेशात देण्यात आली आहे. यामुळे न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता आणि सोयीस्करता सुनिश्चित होईल. प्रत्येक कार्यालयाला झालेल्या सुनावण्या व त्यातून झालेली प्रगती यासंदर्भात तपशीलवार मासिक अहवाल सादर करावा लागणार आहे. या अहवालांचे पुनरावलोकन स्वतः जिल्हाधिकारी करतील, जेणेकरून या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित होईल. या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना देखरेख व समन्वयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांनी प्रत्येक सुनावणीला बारकाईने लक्ष द्यायचे असून, प्रकरणांचे निकालनिर्णय कायदेशीर चौकटीतच व्हावेत याची खातरजमा करावी लागणार आहे. वेळीच न्याय देणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे,असे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल न्यायालयीन व्यवस्थेत गतिमानता आणण्याच्या प्रशासनाच्या कटिबद्धतेवर भर दिला.

# सोनसोडो डंप यार्ड होणार 'ग्रीन झोन'

## राज्यभरात पाच लाख झाडांची लागवड

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ५ :** गोवा सरकारच्या पर्यावरण संवर्धनाच्या व्यापक मोहिमेअंतर्गत मडगावमधील सोनसोडो डंप यार्ड आता 'ग्रीन झोन'मध्ये रूपांतरित होणार आहे. राज्याचे वनमंत्री विश्वजित राणे आणि मडगावचे आमदार दिगंबर कामत यांच्या उपस्थितीत गुरुवारी या डंप साइटवर वृक्षारोपण मोहिमेचा औपचारिक शुभारंभ झाला.

या उपक्रमाअंतर्गत प्रारंभीच्या टप्प्यात सुमारे ४०० झाडांची लागवड करण्यात आली. हवामान बदलाचा प्रभाव कमी करणे, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि शहरी भागांतील पर्यावरण पुनरुज्जीवन हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राज्यभरात सुरू झालेल्या या अभियानाचा एक भाग म्हणून सोनसोडोतील ही मोहिम राबवली जात आहे.

कार्यक्रमात बोलताना मंत्री राणे यांनी जाहीर केले की, पुढील तीन महिन्यांत राज्यभरात एकूण पाच लाख झाडे लावण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. गोव्याचे हरित क्षेत्र वाढवण्यासाठी ही महत्त्वपूर्ण मोहीम असून, ही झाडे केवळ लावण्यात नाही तर त्यांची निगा राखण्यातही शासन



कटिबद्ध आहे, असे ते म्हणाले.

झाडांची निगा राखण्यासाठी गोवा राज्य शहरी विकास संस्था (जीएसयूडीए ) जबाबदारी घेणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांवर कोणताही आर्थिक भार पडू दिला जाणार नाही, असे राणे यांनी स्पष्ट केले. नगरपालिका क्षेत्रांतील उपलब्ध मोकळ्या जागांवर झाडे लावण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

सोनसोडो डंप यार्ड हे या उपक्रमातील पहिले 'पायलट प्रोजेक्ट' असून, एकदा विकसित झाल्यानंतर या भागाचे रूपांतर हिरवळीत होऊन पर्यावरणीय आणि सौंदर्यदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनणार आहे. यामुळे विद्यमान कचऱ्याचे दृश्यात्मक दुष्परिणामही लपवले जातील.

आमदार दिगंबर कामत यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले, सोनसोडोचा उल्लेख आजवर केवळ कचरा समस्येशी संबंधित केला जात होता. मात्र आता येथे सुरू असलेले हरित परिवर्तन हे सकारात्मक दिशेने उचललेले पाऊल आहे. ही मोहीम इतर शहरी भागांसाठीही आदर्श ठरेल.

कामत यांनी पुढे सांगितले की, शहरी भागांमध्ये जंगल निर्मिती हा अभिनव उपक्रम असून, त्याचे श्रेय वनमंत्री राणे यांना द्यायला हवे. यशस्वी अंमलबजावणीसाठी जनतेच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे, असे ते म्हणाले.

मंत्री राणे यांनीही कामत यांच्या नेतृत्वाचे कौतुक करत म्हटले, गोव्यासाठी दूरदृष्टी असलेले स्थानिक नेते अत्यावश्यक आहेत. त्यांच्याच सहकार्यामुळे आपण शाश्वत पर्यावरणीय बदल घडवू शकतो.


# गोव्यात उंच इमारतींसाठी 'व्हर्टिकल फॉरेस्ट' अनिवार्य

## शाश्वत शहरी विकासासाठी सरकारचा निर्णायक निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ५ :** गोव्यातील शहरी भागांमध्ये हरित क्षेत्र वाढवण्याच्या दृष्टीने मोठे पाऊल टाकत, राज्य सरकारने २५० ते ३०० एफएसआय (फ्लोअर स्पेस इंडेक्स) असलेल्या उंच इमारतींसाठी उभे वन ' अर्थात व्हर्टिकल फॉरेस्ट' संकल्पना अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील अधिकृत अधिसूचना लवकरच जारी केली जाणार असल्याची घोषणा राज्याचे शहरी विकास व नगर आणि ग्रामनियोजन मंत्री विश्वजित राणे यांनी गुरुवारी केली.

मडगाव येथील सोनसोडो डंप यार्डवर वृक्षारोपण मोहिमेदरम्यान पत्रकारांशी बोलताना राणे म्हणाले, गोव्याच्या शहरी भागात हिरवळ टिकवून ठेवण्याची आणि वाढवण्याची ही वेळ आहे. उंच इमारतींमध्ये व्हर्टिकल फॉरेस्ट' संकल्पना राबवणे हे पर्यावरणपूरक



आणि शाश्वत बांधकामाचे भविष्य आहे.

राणे यांनी स्पष्ट केले की या उपक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्व मान्यता आधीच मिळाल्या असून, लवकरच मार्गदर्शक तत्त्वे अधिकृतपणे अधिसूचित केली जातील. महत्त्वाचे म्हणजे, उभे वन संकल्पनेचे अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या इमारतींच्याच भोगवटा प्रमाणपत्रांना मान्यता दिली जाईल.

कोणतीही नवीन उच्च-घनतेची निवासी किंवा व्यावसायिक इमारत आता विना-हरित पायाभूत सुविधा मंजूर केली जाणार नाही, असे राणे यांनी स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे बिल्डर्सना डिझाइनच्या सुरुवातीपासूनच पर्यावरणीय घटकांचा समावेश करावा लागणार आहे. सिंगापूर आणि इटलीतील मिलान शहरांमध्ये यशस्वी ठरलेल्या वर्टिकल फॉरेस्ट प्रकल्पांपासून प्रेरणा घेऊन गोव्यात ही संकल्पना राबवली जाणार आहे. या मॉडेलमध्ये उंच इमारतींमध्ये झाडे, वेली, झुडपे आणि इतर प्रकारची हरित संरचना अंगभूत केली जाते. यामुळे केवळ पर्यावरणपूरक सौंदर्य नव्हे, तर वायुप्रदूषण कमी करणे, उष्णता कमी करणे, आणि शहरी जैवविविधतेला प्रोत्साहन मिळवणे शक्य होते.

गोव्यातील शहरी नियोजनाचे हे एक निर्णायक वळण आहे. भारतात पहिल्यांदाच एवढ्या व्यापक पातळीवर अशा प्रकारचा हिरवागार उपक्रम राबवला जाणार आहे, असे राणे यांनी नमूद केले.

या धोरणामुळे बांधकाम व्यवसायातील प्रस्थापित प्रथांमध्ये परिवर्तन घडणार असून, पर्यावरणपूरक विकासाला प्राधान्य दिले जाणार आहे. सरकारचा उद्देश फक्त हिरवेगार टॉवर्स उभारणे नसून, त्यांच्या सातत्यपूर्ण देखरेखीसाठी यंत्रणा निर्माण करणे हाही आहे.

हा उपक्रम केवळ गोव्यासाठी नव्हे, तर संपूर्ण देशासाठी शाश्वत शहरीकरणाचे मॉडेल ठरेल, असा विश्वासही मंत्री राणे यांनी व्यक्त केला.

गोव्यातील वाढत्या शहरीकरणाला पर्यावरणपूरक दिशा देणाऱ्या या निर्णयामुळे येत्या काळात शहरे केवळ सिमेंटच्या जंगलांत नव्हे, तर वास्तवातही हिरवळीत न्हालेली दिसतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ईएसआय रुग्णालयाचे तातडीने पुनरुज्जीवन आवश्यक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ५ :** मडगाव येथील कर्मचारी राज्य विमा (ईएसआय) रुग्णालयाची कार्यक्षमता आणि सेवा दर्जा उंचावण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवण्याची गरज असल्याचे मत सरकारने नियुक्त केलेल्या सुधारणा पॅनेलचे प्रमुख आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी बुधवारी व्यक्त केले.

रुग्णालयाला दिलेल्या अचानक भेटीत डॉ. शेट्ये यांनी १०० खाटांच्या या शासकीय रुग्णालयाच्या व्यवस्थापनात व पायाभूत सुविधांमध्ये गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आणले. त्यांनी वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी चर्चा करत सेवा पुरवठ्याचा थेट आढावा घेतला.

हे रुग्णालय दोन लाखांहून अधिक कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी बांधण्यात आले आहे. मात्र, आज येथे फारच मर्यादित सेवा उपलब्ध आहेत. या संस्थेचा पुनर्विकास अपरिहार्य आहे, असे डॉ. शेट्ये यांनी सांगितले.

डॉ. शेट्ये लवकरच कामगार मंत्री ॲटेन्सिओ मोन्सेरात यांच्याकडे सुधारणा सूचवणारा सविस्तर अहवाल सादर करणार आहेत. या अहवालात रुग्णालयाच्या कार्यपद्धतीत मूलभूत बदल सुचवण्यात येणार आहेत.

सध्या रुग्णांना शासकीय रुग्णालयात उपचार घेऊन त्याची परतफेड घेण्याची जोखीम असलेली पद्धत राबवली जाते. ती पद्धत बंद करून, केवळ ईएसआय सल्लागाराच्या लेखी परवानगीनेच रुग्णाला इतरत्र उपचार घेण्याची परवानगी द्यावी, अशी शिफारस त्यांनी केली.

ईएसआयच्या रुग्णसेवेत त्वरित सुधारणा घडवण्यासाठी, संपूर्णवेळ वैद्यकीय अधीक्षक व विविध शाखांतील अधिक सल्लागारांची नेमणूक आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जर तज्ज्ञांची सेवा उपलब्ध नसेल, तर रुग्ण पुन्हा ईएसआयकडे वळणार नाहीत, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

पॅनेलने प्रयोगशाळा चाचण्या, एक्स-रे, ईसीजी यांसारख्या मूलभूत निदान सेवा २४७ कार्यरत ठेवण्याचे ठरवले आहे. तसेच ऑपरेशन थिएटरमध्ये वातानुकूलन व्यवस्था, औषध खरेदीत पारदर्शकता, आणि विविध विभागांमध्ये समन्वय यावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे.

विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आणि जबाबदारीची स्पष्टता नसल्यामुळे सेवा विस्कळीत होत आहेत. कार्यक्षम यंत्रणा तयार करून, हे रुग्णालय पुन्हा कामगार वर्गाच्या विश्वासाचे केंद्र ठरू शकते, असे डॉ. शेट्ये यांनी नमूद केले.या उपेक्षित संस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी सरकार आणि संबंधित विभागांनी आता त्वरित निर्णय घेणे अपेक्षित आहे.

# गोव्यातील पाकिस्तानी नागरिकाची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ केंद्राच्या व्हिसा रद्दीकरण निर्णयाला आव्हान

**पणजी, दि. ५ :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्वच व्हिसा रद्द केल्याच्या पार्श्वभूमीवर, २०१६ पासून गोव्यात वास्तव्यास असलेल्या एका पाकिस्तानी नागरिकाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

केंद्र सरकारच्या निर्णयानुसार, वैद्यकीय, राजनैतिक, अधिकृत आणि दीर्घकालीन व्हिसा वगळता इतर सर्व व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आले आहेत. वैद्यकीय व्हिसादेखील केवळ २९ एप्रिलपर्यंत वैध मानण्यात आला होता.

संबंधित याचिका न्यायमूर्ती संजय करोल आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर मांडण्यात आली. सुनावणीदरम्यान, खंडपीठाने याचिकाकर्त्याला पाकिस्तानात परत जाण्याचा सल्ला दिला. मात्र, यावर याचिकाकर्त्याच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की , याचिकाकर्त्याला परत जाण्याचा आक्षेप नाही, मात्र भारतात दीर्घकालीन व्हिसा मिळवण्यासाठी विशिष्ट अटी असून त्या निकषांनुसार सुनावणी व्हावी, अशी विनंती केली. खंडपीठाने जेव्हा विचारले की हे प्रकरण स्थानिक म्हणजे गोवा खंडपीठात का मांडण्यात आले नाही, तेव्हा वकिलांनी स्पष्ट केले की स्थानिक पोलीस सातत्याने याचिकाकर्त्याच्या राहत्या घरी भेट देत असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्यात आला.

प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेण्यास सहमती दर्शवून ते पुढील यादीत समाविष्ट करण्याचे आदेश दिले.

# मुर्डी-खांडेपार येथे पूराची भीती

## बेकायदेशीर वाळू उपशामुळे किनाऱ्याची प्रचंड धूप

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ५ :** मुर्डी खांडेपार परिसरात खांडेपार (दूधसागर) नदीच्या काठावर बेकायदेशीर वाळू उपशामुळे किनाऱ्याची झपाट्याने होणारी धूप स्थानिकांसाठी डोकेदुखी ठरत असून, आगामी पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिकांच्या मते, सक्शन पंपांद्वारे सातत्याने सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे नदीपात्राच्या किनाऱ्यालगत सुमारे १२ मीटर लांबीचे मोठा भूस्खलन झाला आहे. त्याचबरोबर, सुमारे २० मीटर लांबीच्या भेगा नदीकाठावर आढळून आल्या असून, यामुळे परिसरातील



मातीची झपाट्याने होणारी झीज अधिक गतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या भागातील नागरिकांनी यापूर्वीही मुर्डी येथे प्रस्तावित १०० कोटींच्या बंधाऱ्याला तीव्र विरोध केला होता, कारण त्यातून पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. परिणामी, सरकारने हा प्रकल्प मागे घेतला. मात्र सध्या मातीची झालेली धूप आणि नदीपात्राचे रुंदीकरण यामुळे पुन्हा पूराचा धोका वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

एक जमीनधारक आधीच आपल्या शेतीची जमीन नदीत गमावल्याचे सांगत असून, आणखी जमीन गमावण्याची शक्यता असल्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

स्थानिकांनी याबाबत मागील वर्षी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. तपासणीसाठी अधिकाऱ्यांनी भेट दिली होती, मात्र वाळू उपसा थांबवण्यात यश आलेले नाही.

फोंडा पोलिसांच्या तक्रारीवरून २८ मार्च रोजी कॅप्टन ऑफ पोर्ट्स, फोंडा तहसील कार्यालय आणि पोलिसांनी संयुक्तपणे बागा खांडेपार परिसरात छापा टाकून नदीकाठावर साठवलेला सुमारे ३० घनमीटर वाळू साठा जप्त केला होता. ही कारवाई नागरिकांच्या तक्रारीवरून करण्यात आली होती.

खांडेपार नदी ही कर्नाटकातून उगम पावते आणि पावसाळ्यात गोव्यात मोठ्या वेगाने प्रवेश करते. १९८४ आणि २०२१ मध्ये या परिसरात मोठे पूर आले होते. त्यामध्ये अनेक घरे पाण्याखाली गेली होती, तर काही मातीची घरे कोसळली होती.

सध्या पुन्हा अशीच परिस्थिती ओढवू नये यासाठी स्थानिकांनी खांडेपार परिसरात वाळू उपसा पूर्णपणे थांबवावा, अशी ठाम मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

# भटवाडी-नानोडा येथील बंद चिरेखणीवर पर्यटकांचे धुमशान

■ टीम दैनिक हेराल्ड

## पोलिसांकडून कडक कारवाईची मागणी

**साळ, दि. ५ :** भटवाडी-नानोडा परिसरातील बंद असलेल्या धोकादायक चिरेखणी पावसाळ्यातील पर्यटकांसाठी धोकादायक बनल्या आहेत . या ठिकाणी अंतर्गत बहरणाऱ्या धबधब्यांसह खोल चिरेखाणीमुळे पर्यटकांचे आकर्षण वाढले असले तरी, मद्यधुंद अवस्थेत येणाऱ्या काही पर्यटकांना पाण्याच्या खोलतीचा अंदाज नसल्यामुळे अनेकांना जीवाला धोका निर्माण होत आहे.

पंचायत क्षेत्रातील एका बंद चिरेखणीवर पोलिसांनी आणि स्थानिकांनी प्रतिबंधात्मक फलक लावले असले तरीही काही पर्यटक त्याचा अवहेलना करत धोकादायक ठिकाणी आंघोळीसाठी येत आहेत. अलीकडेच पणजीहून आलेल्या सात पर्यटकांनी या प्रतिबंध फलकांची दखल न घेता बेधुंद अवस्थेत चिरेखणीमध्ये पोहत असताना स्थानिकांनी त्यांची माहिती गोवा दोडामार्ग आऊटपोस्ट पोलिसांना दिली. तत्काळ पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत कारवाई केली, मात्र काही वेळाने समज देऊन त्यांना सोडण्यात आले.

गेल्या वर्षीही स्थानिकांच्या आग्रहाखातर आणि पोलिसांच्या




मदतीने या धोकादायक चिरेखणीवर पर्यटकांसाठी बंदी घालण्यात आली, तसेच फलक लावण्यात आले होते. मात्र पर्यटकांनी फलक काढून टाकल्याने समस्या कायम आहे. प्रतिबंधात्मक फलक असूनही अनेक वेळा बेधुंद अवस्थेतील पर्यटक आल्याने पोलिसांनी कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

स्थानिक पंच दिलीप वरक यांनी सांगितले की, पर्यटक बेधुंद अवस्थेत येतात आणि पोलिसांनी त्यांच्यावर समज देऊन सोडण्याऐवजी कडक कारवाई करावी. जेव्हा आम्ही पोलिसांना संपर्क करतो तेव्हा ते आपली जबाबदारी पार पाडावीत आणि अशा धोकादायक ठिकाणी वेळेवर नियंत्रण ठेवावे. आम्हाला आशा आहे की प्रशासन आणि पोलिस यांमध्ये समन्वय वाढेल आणि स्थानिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती कठोर पावले उचलली जातील.

स्थानिकांनी सरकारकडेही पोलिसांना अधिक अधिकार देण्याची आणि बेधुंद पर्यटकांवर योग्य ती कारवाई करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलण्याची विनंती केली आहे.

# गोपनीय माहिती खरेदी विक्रीचा प्रयत्न करणाऱ्याला अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि.५ :** क्रिप्टोकरन्सी व्यवहारांचा वापर करून संवेदनशील वैयक्तिक डेटा ऑनलाइन ॲक्सेस करण्याचा आणि व्यापार करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली गोवा पोलिसांच्या सायबर क्राईम अधिकाऱ्यांनी अहमदाबाद येथील एका ४२ वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे.

विशाल गोहिल असे या आरोपीचे नाव असून त्याला बुधवारी कळंगुट येथे अटक करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६६ अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक (सायबर क्राईम) राहुल गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे की गोहिल गोपनीय डेटा खरेदी करण्याचा आणि टेलिग्रामसारख्या एन्क्रिप्टेड प्लॅटफॉर्मद्वारे विक्रीसाठी देण्याचा प्रयत्न करत होता. व्यवहार लपविण्यासाठी पेमेंट चॅनेल क्रिप्टोकरन्सीद्वारे राउट करण्यात आले होते.

गोहिल सध्या कोठडीत आहे आणि किती प्रमाणात डेटा ॲक्सेस केला गेला आहे याची पडताळणी करण्यासाठी, आर्थिक मार्गांचा मागोवा घेण्यासाठी आणि गुन्ह्यात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही सह-षड्यंत्रकर्त्यांना किंवा डिजिटल प्लॅटफॉर्मची ओळख पटविण्यासाठी पुढील तपास सुरू आहे, असे त्यांनी पुढे सांगितले.

गोवा पोलिसांनी जनतेला संशयास्पद ऑनलाइन क्रियाकलापांबद्दल सतर्क राहण्याचे आणि सायबर गुन्ह्यांची तक्रार रायबंदरमधील सायबर क्राईम पोलिस स्टेशनला करण्याचे किंवा १९३० या हेल्पलाइनवर कॉल करण्याचे आवाहन केले आहे.